'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० | मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026 संपर्क : मो. ९०११२०१४१४
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई** Email ID : shabdarutu@gmail.com

* वर्ष २ रे * अंक ३० वा * रविवार दि. २७ एप्रिल २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ * किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

## डॉ. तनपुरे कारखाना निवडणूक लढण्याची धडपड कशासाठी


देवळाली प्रवरा : लोकसभा व विधानसभा निवडणुकीत राहुरी तालुक्याची कामधेनू म्हणून ओळख असलेल्या व सद्यस्थितीत बंद असलेल्या डॉ. कारखाना सुरु करण्यासाठी ना सत्ताधारी काही बोलले, ना विरोधक काही बोलले. ना उत्तरेत चर्चा झाली, ना दक्षिणेत. सर्वांनीच हाताची घडी व तोंडावर बोट ठेवणे पसंत केले. जाणू-बूजून या विषयाला बगल देण्यात आली. परंतु, आज कारखान्याची निवडणूक जाहीर होताच सर्वांनीच दंड थोपटले आहेत.

# दोन संशयित अतिरेकी पुण्यातील पर्यटकाच्या कॅमेऱ्यात कैद

मुंबई : जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरून गेला आहे. या भीषण हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा जीव गेला. या हल्ल्यानंतर भारतीय तपास यंत्रणा पूर्णपणे अलर्ट मोडवर असून जम्मू-काश्मीरच्या विविध भागांत मोठ्या प्रमाणात शोध मोहीम सुरू आहे. दरम्यान, या हल्ल्यात सहभागी असलेले दोन संशयित दहशतवादी पुण्यातील पर्यटकांच्या मोबाईलमध्ये कैद झाले आहेत. पहलगाम हल्ल्यातील हा महत्त्वाचा पुरावा मानला जात आहे. श्रीजीत रमेशन असे पर्यटकाचे नाव असून त्यांनी हा पुरावा एनआयएकडे दिला आहे.

पुण्यातील देहूरोड येथील रहिवासी श्रीजीत रमेशन हे १८ एप्रिल रोजी आपल्या कुटुंबासह काश्मीरमध्ये फिरायला गेले होते. ते पहलगामपासून अवघ्या सात-साडेसात किलोमीटर अंतरावर असलेल्या प्रसिद्ध बेताब व्हॅलीमध्ये फिरत होते. बेताब व्हॅलीमध्ये फिरताना श्रीजीत आपल्या मुलीचा मोबाइलवर व्हिडिओ (रिल्स) शूट करत होते. याच दरम्यान, त्या व्हिडिओमध्ये दोन संशयित दहशतवादी त्यांच्या मुलीच्या पाठीमागून जाताना स्पष्टपणे दिसत आहेत. श्रीजित रमेशन यांनी याबाबतची माहिती एनआयएला दिली असून या व्हिडिओ आणि फ़ोटोची संपूर्ण तपासणी एनआयकडून केली जात आहे.

आम्ही १८ तारखेला पहलगामला गेलो, जिकडे २२ तारखेला हल्ला झाला. बेताब व्हॅली परिसरात



आम्ही गेलो असताना माझ्या सहा वर्षीय मुलीचे रील शूट करीत असताना तिच्या मागून दोन संशयित लोक गेले. आम्ही काश्मीरवरून सुखरुपरित्या घरी पोहोचलो. घरी आल्यावर हल्ल्याची वार्ता आम्हाला समजली. तसेच टीव्हीवरून दहशतवाद्यांचे फोटो आम्ही ज्यावेळी पाहिले, त्यावेळी हेच दोन दहशतवादी रिल्समध्ये शूट झाल्याचे आमच्या लक्षात आले. आम्ही पहलगाम, बेताब व्हॅली या ठिकाणचे सगळे फोटो, रिल्स, व्हिडीओ तपासले. त्यावेळी आमच्या असे लक्षात आले की यांच्या हालचाली संशयित होत्या. चारमधील दोन दहशतवाद्यांचे चेहरे आमच्या मोबाईलमधल्या फोटोंशी जुळत होते.

आम्ही लगोलग दिल्ली एनआयएमधील अधिकाऱ्यांना फोन करून संबंधित प्रकार कळवला. त्यांनी आम्हाला एका वरिष्ठ अधिकाऱ्याचा मोबाईल नंबर दिला ज्यावर आम्ही संपूर्ण फोटो आणि व्हिडीओ पाठवले आहेत. फोटो आणि व्हिडीओ पाहिल्यानंतर एनआयए अधिकारी त्याची पुष्टी करतील, असे श्रीजीत रमेशन म्हणाले.


पाकिस्तानी नागरिकांना परत पाठवण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. कुणी अवैधरीत्या राहत असेल, तर त्यांचाही शोध घेतला जाईल, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यामध्ये पहलगाम अतिरेकी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गणबोटे यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांनी देवेंद्र फडणवीस हे २०३४ सालापर्यंत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहणार असल्याच्या विधानावरही प्रतिक्रिया दिली. पूर्ण बातमी वाचा...

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरातील परदेशी नागरिकांवर कारवाई सुरू झाली आहे. गुजरातमधील अहमदाबाद (८९०) आणि सुरत (१३४) येथे पोलिसांनी शनिवारी महिला आणि मुलांसह सुमारे एक हजार बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांना ताब्यात घेतले. जर वैध कागदपत्रे सापडली नाहीत, तर त्यांना भारतातून हद्दपार केले जाईल.

## नवी कोरी पुस्तकं




**डेड एण्ड**
: लेखकाचे नाव :
पंकज कुरुलकर
किंमत रु. : ४५०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर





**प्रतिवृत्तांत सातपाटील कुलवृत्तांतः प्रत्यय नोंदी**
: लेखकाचे नाव :
सुमती लांडे
किंमत रु. : ९००/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर

# तप्त उन्हाळ्यात महाराष्ट्रात पावसासह गारपिटीचा इशारा

मुंबई : महाराष्ट्रभर नागरिकांना सध्या तीव्र उन्हाचा सामना करावा लागत आहे. विदर्भात तर तापमानाचा रोज नवा उच्चांक पाहायला मिळत आहे. तर मराठवाड्यातही सूर्य तळपला आहे. अशातच राज्यात पुढील चार दिवस मिश्र स्वरुपाचे वातावरण राहणार असल्याची माहिती आहे. भारतीय हवामान विभागाने विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

हवामान तज्ज्ञ के एस होसाळीकर यांनी एक्स हँडलवर ट्विट करत यासंदर्भीत माहिती दिली आहे. ते म्हणाले, हवामान विभागाने राज्यात पुढील ४ ते ५ दिवसांत मिश्र प्रकारचे तीव्र हवामानची शक्यता वर्तवली आहे. विदर्भात २७ आणि २८ एप्रिलला काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. अकोला आणि चंद्रपूरमध्येच उष्णतेच्या लाटेचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर आता गारपिटीचाही अंदाज




आहे. ज्यासाठी हवामान विभागाने आता चंद्रपूर आणि गडचिरोलीसाठी २७ एप्रिलला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

'मराठवाड्यात आणि मध्य महाराष्ट्रात देखील मिश्र वातावरण असणार आहे. या प्रदेशात उष्ण आणि दमट परिस्थिती असणार आहे. तसेच गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर आज दक्षिण कोकणात गडगडाटासह पाऊस येण्याची शक्यता आहे.' असेही होसाळीकर यांनी नमूद केले.

तर २८ एप्रिलला विदर्भात पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोलीत यलो अलर्ट असणार आहे. तर भंडारा आणि गोंदियाला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विदर्भवासीयांना उन्हाळा तीव्र झळा बसत आहेत. दुपारच्या सुमारास घराच्या बाहेर जाणे जीवावर येते. ही स्थिती असते मे महिन्यात. मात्र, यावर्षी एप्रिल महिन्यातच ही उष्णता नकोशी झाली आहे. दुपारच्या वेळेस रस्ते ओस पडल्याचे दिसून येत आहे. अशात पावसाचा इशारा देण्यात आल्याने विदर्भवासीयांना काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. परंतु शेतकऱ्यांनी शेतीपिकांची विशेष काळजी घ्यावी लागणार आहे.

# पहलगाम हल्ल्याप्रकरणी आम्ही तटस्थ चौकशीला तयार; पाकिस्तानच्या पंतप्रधानांची पहिली प्रतिक्रिया!



नवी दिल्ली : जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला भारताने पाकिस्तानला जबाबदार धरलं आहे. मात्र, पाकिस्तानने या हल्ल्याची जबाबदारी घेणं टाळलं. या हल्ल्याशी आमचा काहीही संबंध नसल्याचं पाकिस्तानचे संरक्षण मंत्री खवाजा असिफ म्हणाले आहेत. आता या ही पुढे जाऊन पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. पाकिस्तान या हल्ल्याप्रकरणी तटस्थी चौकशीला तयार असल्याचं ते म्हणालेत. वृत्तसंस्था एएफपीने दिलेल्या अहवालावरून इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिलं आहे.

पहलगाम येथे झालेला हा हल्ला पाकिस्ताननेच केल्याचा दावा भारताने तांत्रिक बुद्धिमत्ता आणि विश्वसनीय माहितीच्या आधारावर केला आहे. या दाव्यानंतर पाकिस्ताने आपली भूमिका स्पष्ट केली. या हल्ल्यातील प्रत्यक्षदर्शींमधील गुप्त-चर सूत्रांमुळे या हल्ल्यातील दहशतवाद्यांची ओळख पटली आहे, असंही इंडियन एक्स्प्रेसने वृत्ता म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गेल्या दोन दिवसांत १३ जागतिक नेत्यांशी संवाद साधून, दिल्लीत ३० हून अधिक राजदूत आणि परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री, परराष्ट्र मंत्रालयातील इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीतून ही माहिती मिळाली आहे.

पश्चिमेकडील देशांसाठी दहशतवादी संघटनांना पाठिंबा देणे, प्रशिक्षण देणे आणि निधी देण्याचा पाकिस्तानचा हा इतिहास म्हणजे पाकिस्तानचं सर्वांत वाईट काम आहे, असं पाकिस्तानचे संरक्षण मंत्री खवाजा असिफ यांनी काल म्हटलं होतं. त्यानंतरच, पंतप्रधान शरीफ यांचं हे विधान आलं आहे. ते स्काय न्यूजला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते.

भारताने पाकिस्तानविरुद्ध कठोर राजनैतिक पावले उचलण्यास सुरुवात केली असून, या हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग सिद्ध करण्यासाठी पुरेसे पुरावे असल्याचे सांगितले आहे. या संकटाच्या काळात भारताला पाठिंबा दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी पाठिंबा देणाऱ्या देशांचे आभार मानले आहेत. याचबरोबर सर्व परदेशी नागरिकांसाठी भारत भारत सुरक्षित आहे. त्यामुळे कोणत्याही देशाने त्यांच्या नागरिकांसाठी ट्रॅव्हल अॅडव्हाझरी जारी करण्याची घाई करण्याची गरज नसल्याचे भारताने म्हटले आहे.

# नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जूनपासून

पुणे : राज्यात नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी शालेय शिक्षणात यावर्षीपासून प्रत्यक्षात सुरू होत आहे. शिक्षण विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार, येणाऱ्या जून २०२५ पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षात पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी नवा अभ्यासक्रम लागू होणार आहे. हा निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने जाहीर केला असून, शिक्षणाच्या पद्धतीत आणि रचनेत मोठा बदल अपेक्षित आहे.

नवीन शैक्षणिक धोरणाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे शिक्षणाची पूर्वीची प्राथमिक आणि माध्यमिक अशी रचना आता चार स्तरांमध्ये विभागली जाणार आहे. यात पायाभूत, पूर्वतयारी, पूर्व माध्यमिक आणि माध्यमिक हे टप्पे वयोगटानुसार ठरवले गेले असून, मुलांच्या मानसिक आणि शैक्षणिक गरजेनुसार अभ्यासक्रम आखण्यात आले आहेत. यामध्ये २०२५-२६ मध्ये पहिलीसाठी नव्या अभ्यासक्रमाची सुरुवात, २०२६-२७ मध्ये दुसरी, तिसरी, चौथी आणि



सहावीचे नवे अभ्यासक्रम, २०२७-२८ मध्ये पाचवी, सातवी, नववी आणि अकरावीतील बदल, २०२८-२९ मध्ये आठवी, दहावी आणि बारावीचे अभ्यासक्रम नव्याने रचले जातील. या धोरणानुसार मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी पहिलीतूनच हिंदी भाषा शिकवणे अनिवार्य करण्यात आले आहे.

या नवीन शिक्षणपद्धतीत एनसीईआरटीच्या धर्तीवर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने नव्या अभ्यासक्रमाची रूपरेषा तयार केली आहे. त्यामुळे शालेय अभ्यासक्रम अधिक समग्र. मूल्यमापनाधिष्ठित व कौशल्याधारित होणार आहे. शाळांचे वेळापत्रक, विषयांचे नियोजन, मूल्यांकन पद्धती आणि परीक्षा वेळापत्रकातही आवश्यक त्या सुधारणा करण्यात येणार आहेत. संपूर्ण शैक्षणिक वर्षाचे नियोजनच्या मार्गदर्शनाखाली केले जाईल आणि शाळांना हे नियोजन जूनपूर्वी उपलब्ध करून दिले जाईल.

दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी यापूर्वीच महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे. हा निर्णय लागूही करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. दोन वर्षांपूर्वी दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी हा नियम नव्हता. मात्र, मार्च २०२३ मधील परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे. यासंदर्भात सर्व शाळा आणि ज्युनिअर कॉलेजांना आदेशही देण्यात आले होते.

# पुण्यात १०० पेक्षा अधिक पाकिस्तानी नागरिक

पुणे : जम्मू काश्मीरमध्ये दहशदवादी हल्ला करुन अशांतता निर्माण करण्यात आली आहे. पहलगाम भागात भीषण दहशतवादी हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात हिंदू पर्यटकांना लक्ष्य करण्यात आले. यामध्ये आतापर्यंत २८ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये सहा महाराष्ट्रातील पर्यटकांचा समावेश आहे. या घटनेचे तीव्र पडसाद आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील पडत आहेत. हल्ला झाल्यानंतर भारताने मोठे निर्णय घेतले आहेत. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. पुण्यात सध्या १११ पाकिस्तानी नागरिक वास्तव्यास असल्याची माहिती समोर आली आहे.

दहशतवादी हल्ल्यानंतर देशात राहत पाकिस्ताविरोधात कडक भूमिका घेत भारतात राहत असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्याचे आदेश दिले जात असतानाच पुण्यातून ३ नागरिकांनी देश सोडला आहे. तर पुण्यात सध्या १११ पाकिस्तानी नागरिक वास्तव्यास असल्याची माहिती समोर आली आहे. केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर या नागरिकांची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. भारतात व्हिसावर आलेल्या या परदेशी नागरिकांत मुस्लिम, सिंधी व हिंदू समाजाच्या व्यक्तींचा समावेश आहे.

केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत, भारतात वास्तव्यास असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत देश सोडण्याचे आदेश दिले आहेत. पुणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सध्या एकूण १११ पाकिस्तानी नागरिक वास्तव्यास आहेत. यापैकी ५६ महिला आणि ३५ पुरुष दीर्घकालीन व्हिसावर भारतात आले आहेत, अशी माहिती देण्यात आली आहे. तसेच २० नागरिक व्हिजिटर व्हिसावर तसेच इतर वेगवेगळ्या कारणासाठी पुण्यात आलेले आहेत. केंद्र सरकारच्या आदेशानंतर शहरातील सर्व पाकिस्तानी नागरिकांची माहिती संकलित केली जात आहे. त्यांच्याकडे असलेल्या व्हिसा आणि इतर कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. केंद्र सरकारच्या घोषणेनंतर आतापर्यंत तीन पाकिस्तानी नागरिकांनी पुणे पोलिसांच्या परकीय नागरिक नोंदणी कार्यालयाकडून (एफआरओ) एक्झिट' प्रमाणपत्र घेतले असून, लवकरच ते भारत सोडून जाणार आहेत. उर्वरित नागरिकांच्याही परतीच्या प्रक्रियेला गती देण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# विनोदाच्या प्रांतात महिला कमीच! : ज्येष्ठ लेखिका मंगला गोडबोले

पुणे : विनोदाच्या प्रांतात महिलांची संख्या अद्यापही कमीच असल्याचे मत ज्येष्ठ लेखिका मंगला गोडबोले यांनी बुधवारी व्यक्त केले. वास्तवापासून क्षणभर दूर जाऊन विचार करण्याचा मोकळेपणा, मनाचे मुक्तपण महिलांना दीर्घ काळ मिळत नाही. त्यामुळे पूर्वीपासूनच विनोदाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांची संख्या कमीच दिसते,' असे गोडबोले यांनी सांगितले.

वक्तृत्वोत्तेजक सभेतर्फे आयोजित वसंत व्याख्यानमालेच्या दुसऱ्या सत्रात गोडबोले बोलत होत्या. मराठी विनोद : काल, आज आणि उद्या' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. मराठी विनोदाला दीर्घ परंपरा आहे. आधुनिक काळात कोल्हटकरांनी मराठी साहित्याला वाट मोकळी करून दिली. त्यानंतरच्या प्रत्येक कालखंडात साहित्यातून विनोद मोकळपणाने येऊ लागला. अत्र्यांनी विनोदाचे प्रचंड स्वरूप मराठीला दाखवले. त्यांचा विनोद निर्भीड होता. त्यांच्यानंतर पु. ल. देशपांडे, चिं. वि. जोशी यांच्यासारख्या सिद्धहस्त लेखकांनी ही परंपरा पुढे नेली. चिं. वि. जोशींचा विनोद निर्मळ होता. त्यांच्या एवढा निर्मळ विनोद करणे मराठीत कुणालाही, अगदी पुलंनाही जमले नाही. पुलंनी आकस नसलेला, भाषेचे सौष्ठव दाखविणारा, विलक्षण शब्दखेळाने युक्त विनोद मराठीला दाखवला. त्यांच्या



पारंपरिक शब्दनिष्ठ विनोद आज हरवत चालला आहे. समाजाची भाषेवरची पकड कमी होत आहे. शब्दांची समृद्धी दिवसेंदिवस कमी होताना दिसते.
**मंगला गोडबोले, ज्येष्ठ लेखिका**

विनोदात सहजता होती. भाषेचे सामर्थ्य होते. त्याही पलीकडे जिव्हाळ्याने ओतप्रोत भरलेले लेखन पुलंनी केले,' असे गोडबोले यांनी सांगितले.

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण विनोद साहित्यातून पुढे येऊ लागला. द. मा. मिरासदार, शंकर पाटील यांच्यासारख्या साहित्यिकांनी गावगाड्याच्या जाणिवा, अस्वस्थता विनोदाच्या रूपात मांडल्या. पारंपरिक मराठी साहित्यातील शाब्दिक विनोद त्यांच्या साहित्यात दिसत नाही. मात्र, परिस्थितीवर आधारित विनोद या लेखकांनी मराठीत रुजवला. ग्रामीण भागातील संदर्भ विनोदी अंगाने मराठीत पहिल्यांदाच येण्याचा हा काळ होता. आज शहरी आणि ग्रामीण जीवनात फारसे अंतर राहिलेले नाही. जाणीवांचे सपाटीकरण झालेला हा काळ आहे. त्यामुळे वेगळ्या ग्रामीण संवेदना आजच्या विनोदी लेखानात दिसत नाहीत,' असे त्यांनी नमूद केले.

गोडबोले म्हणाल्या, मनाची तगमग विनोदाच्या माध्यमातून व्यक्त केली जाते. जूनाट रूढी-परंपरांची चेष्टा करणाऱ्या विनोदाचे स्वरूप पालटले आहे. आज विनोदाच्या माध्यमातून सुधारणांची, आधुनिकतेची चेष्टा केली जात आहे. आता विनोदाचा चेहरा बदलतो आहे. दृश्य विनोदाचा पगडा वाढतो आहे. आजचे बटबटीत विनोद बऱ्याचदा अंगावर येतात. याचा गांभीर्याने विचार करायला हवा. जोपर्यंत समाजात श्रेणी आहे, तोपर्यंत विनोदही जिवंत राहील. मात्र, सक्ती हा विनोदाचा सगळ्यात मोठा शत्रू आहे. जशी भाषा अमर आहे, तसाच विनोदही अमर राहील. मात्र, समाजानेही अनावश्यक विनोदाचा हव्यास सोडला पाहिजे. विनोद वापरणाऱ्यांनी तारतम्य बाळगण्याची गरज निर्माण झाली आहे.'

# पुस्तक दिनानिमित्त स्टेट बँकेत मिनी लायब्ररी सुरू



नेवासे : जागतिक पुस्तक दिनानिमित्त शब्दगंध साहित्यिक परिषद नेवासा शाखेच्या वतीने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नेवासा शाखेत ग्राहकांच्या सेवेसाठी मिनी लायब्ररी सुरू करण्यात आली. शब्दगंधचे नेवासा शाखेचे अध्यक्ष प्रा.डॉ. किशोर धनवटे यांच्या संकल्पनेतून ही लायब्ररी सुरू करण्यात आली.

या प्रसंगी शब्दगंध साहित्यिक परिषदेचे नेवासे शाखाध्यक्ष प्रा. डॉ. किशोर धनवटे, समर्पण फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, अरुण देशपांडे, डॉ. संजय सुकाळकर, रणजित नाळे,नेवासा प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण, सुभाष बर्डे, शामभाऊ बेहळे उपस्थित होते. बँकेचे शाखाधिकारी रणजित नाळे यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले.वाचन संस्कृती वाढीस लागावी म्हणून बँकेत व्यवहार करण्यासाठी येणाऱ्या ग्राहकांसाठी हे वाचनालय उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले.

प्रा. डॉ. धनवटे म्हणाले, बँकेत आल्यावर काही वेळेस ग्राहकांना प्रतिक्षेत बसावे लागते, अशा वेळी ग्राहक नक्कीच या मिनी लायब्ररिचा उपयोग करतिल परिणामी त्यांनाही वाचनाची आवड निर्माण होईल म्हणून बँकेचे शाखाधिकारी रणजित नाळे यांच्या सहकार्याने ही मिनी लायब्ररी शब्दगंधच्या वतीने सुरू केली असल्याचे सांगितले. डॉ. करणसिंह घुले यांनी शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने नेवासा तालुक्यात सुरू करण्यात आलेले फिरते वाचनालय उपक्रमही कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

# भारती विद्यापीठात बीज संमेलनाचे आयोजन



पुणे : आधुनिकतेच्या पाठीमागे जाताना आपण निसर्गापासून दूर गेलो असे प्रतिपादन भारती विद्यापीठ हेल्थ सायन्सेसच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप यांनी केले. सह्याद्री देवराई व भारती विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील पहिल्या दोन दिवसीय बीज संमेलनातील हरित संपत्तीचे दालन या प्रदर्शनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले याप्रसंगी त्या बोलत भारती विद्यापीठात महाराष्ट्रातील पहिल्या बीज संमेलनात हरित संपत्तीचे दालन प्रदर्शनाचे उद्घाटनहोत्या. यावेळी सह्याद्री देवराईचे अध्यक्ष सयाजी शिंदे, उपाध्यक्ष अरविंद जगताप, डॉ. इरीच भरुचा, संजय पाटील, सुहास वैंगणकर, सहकार्यवाह डॉ.के. डी. जाधव, डॉ.एम. एस.सगरे, उपस्थित होते.

हे प्रदर्शन भारती विद्यापीठाच्या धनकवडी शैक्षणिक संकुलात दोन दिवस खुले असणार आहे. या प्रदर्शनात देवराईची संक्षिप्त प्रतिकृती, विविध कडधान्य व पालेभाज्यांच्या बियांचे प्रदर्शन, विविध वनस्पतीचे बीज रोप व पानाचे प्रदर्शन, बियांची बाराखडी व वर्णमाला, विविध वनस्पतीच्या कंदांचे प्रदर्शन, आदर्श पाणवठ्याची प्रतिकृती, निसर्गावर आधारित पुस्तकांचे प्रदर्शन, पालखी मधील वृक्ष दिंडी, जुन्या कपड्यांपासून उपयोगी पिशव्यांचे प्रदर्शन अशी विविध प्रकारची प्रदर्शने आहेत.

डॉ. जगताप म्हणाल्या, भारती विद्यापीठाने नेहमीच पर्यावरण रक्षण, जागृती आणि संवर्धनासाठी पुढाकार घेतला आहे. भारती विद्यापीठाच्या पर्यावरणविषयक संस्थेने आजवर केलेले काम देशभर वाखाणले गेले आहे. या महत्त्वाच्या उपक्रमात सहभागी होताना आनंद होत आहे.

सयाजी शिंदे म्हणाले, या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश राज्यातील शाळा आणि महाविद्यालय शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना निसर्ग आणि पर्यावरणाची गोडी लावणे, त्यांना केवळ भाषण न देता कृतिशील सहभाग घ्यायला लावणे. तसेच आपल्या झाडांची आणि बियांची ओळख करून देणे, ती झाडं वाढवण्यासाठी त्यांच्या देखभालीसाठी विद्यार्थ्यांसोबत सक्रिय राहणे हा आहे. सचिन चंदने यांनी आभार मानले. यावेळी प्राध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तीन तालुक्यांत १४३ ठिकाणी महिला सरपंचपद जाहीर

अहिल्यानगर : २०२५ ते २०३० या पाच वर्षांच्या कालावधीसाठी गुरूवारी नगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, शेवगाव आणि नगर प्रांताधिकारी यांनी या तालुक्यातील महिला सरपंच पदाच्या सोडती जाहीर केल्या. यात श्रीगोंदा तालुक्यात ४३ ठिकाणी, नगर तालुक्यात ५२ ठिकाणी तर शेवगाव तालुक्यात ४८ ठिकाणी महिला सरपंचपद जाहीर झाले आहे. तर जामखेड तालुक्यात तांत्रिक कारणामुळे आरक्षण सोडत पुढे ढकलण्यात आली आहे.

जिल्ह्यात पुढील पाच वर्षासाठीची आरक्षण प्रक्रिया सोडतीचा कार्यक्रम सुरू आहे. बुधवारी जिल्ह्यात तहसीलदार यांच्या उपस्थितीत सर्वसाधारण आणि अन्य प्रवर्गातील आरक्षण सोडती पार पडल्या. त्यानंतर गुरूवार (दि.२४) रोजी नगर, श्रीगोंदा आणि शेवगाव तालुक्यातील महिला सरपंच पदाच्या आरक्षण सोडती काढण्यात आल्या. जामखेड तालुक्यात हाळगाव, फक्राबाद आणि धनेगाव ग्रामपंचायतीमधील आरक्षणाचा प्रश्न उपस्थित झाला. याठिकाणी वर्षभरापूर्वी आ-



रक्षण काढण्यात आलेले होते. या ग्रामपंचायतींचा समावेश महिला आरक्षणाच्या यादीत घेण्यात आल्याचे गुरूवारी लक्षात आल्यानंतर या सोडती थांबवण्यात आल्या आहेत.

बेलापूर, नाऊर, उक्कलगाव, कारेगाव, पढेगाव, वडाळा, मालुंजा बुद्रुकमध्ये महिलाराज येणार

श्रीरामपूर तालुक्यातील नऊ ग्रामपंचायतीमध्ये सर्वसाधारण महिला, सात ग्रामपंचायतींवर ना.मा.प्र. महिला, चार ग्रामपंचायतींवर अनुसूचित जमाती महिला तर सात ग्रामपंचायतीवर अनुसूचित जाती महिला आरक्षण जाहीर झाले आहे. येथील प्रशासकीय सभागृहात प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांच्यासमोर महिलांसाठीचे आरक्षण जाहीर झाले. त्यांनी सरपंच पदाचे आरक्षण सर्व नियमांच्या आधारे करून ही सोडत काढली.

गळनिंब, घुमनदेव, गोंडेगाव, मातापूर, मुठेवाडगाव, नाऊर, नायगाव, सरला, बेलापूर बुद्रुक या नऊ ग्रामपंचायतींवर सर्वसाधारण महिला आरक्षण जाहीर झाले आहे. तर भामाठाण, एकलहरे, जाफराबाद, उक्कलगाव, उंदिरगाव, वांगी बुद्रुक, कारेगाव या ग्रामपंचायतीवर ना.मा.प्र. महिला वर्गासाठी आरक्षण जाहीर झाले आहे.

अनुसूचित जमाती महिलांसाठी ब्राम्हणगाव वेताळ, रामपूर, माळेवाडी, वळदगाव या गावाच्या ग्रामपंचायतींवर आरक्षण जाहीर झाले. अनुसूचित जाती महिलांसाठी मांडवे, कुरणपूर, पढेगाव, वडाळा महादेव, निमगाव खैरी, मालुंजा बुद्रुक, लाडगाव आदी ग्रामपंचायती आरक्षित झाल्या आहेत.

# उद्योगांना पूर्ण क्षमतेने पाणी, अखंडीत वीज द्या : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

अहिल्यानगर : औद्योगिक वसाहतीतील उद्योगांना पूर्ण क्षमतेने पाणी, अखंडित वीज पुरवठा करावा, औद्योगिक वसाहतीत पोलिसांची गस्त वाढवावी,असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा उद्योग मित्र समितीच्या बैठकीत डॉ. आशिया बोलत होते. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अतुल दवंगे, औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड,कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी, आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ उपस्थित होते.

डॉ. आशिया म्हणाले, औद्योगिक क्षेत्रामध्ये अनधिकृतपणे स्टॉलधारक व्यवसाय करत असल्याच्या तक्रारी आहेत. असे स्टॉल जप्त करण्यात यावेत. औद्योगिक क्षेत्रात सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस गस्त वाढवण्यात यावी. त्याठिकाणी पोलीस चौकी उभारण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

नव्या एमआयडीसीत उद्योगांसाठी २५ एकर ५ भूखंड ठेवा नागापूर औद्योगिक वसाहती शेजारी होणाऱ्या नवीन औद्योगिक वसाहतीत मोठ्या उद्योगांसाठी २५ एकराचे पाच भूखंड




आरक्षित ठेवावेत. अहिल्यानगर शेजारी असलेल्या ग्रामीण भागातून येणाऱ्या कामगारांसाठी एमआयडीसी पर्यंत इलेक्ट्रिक बस सेवा सुरू करावी, त्याचबरोबर गेल्या काही वर्षापासून बंद असलेली ऊर्जा मित्र समितीची बैठक पुन्हा सुरू करावी, अशी मागणी मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष प्रकाश गांधी यांनी केली.

# जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन का साजरा केला जातो?

पुस्तकांना केवळ एक चांगला मित्रच नाही तर एक चांगला सल्लागार देखील म्हटले जाते. आणि मुलांची पुस्तक मैत्री म्हणजे मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि त्यांना मैत्रीसारख्या मूल्यांबद्दल शिकवणे. यासोबतच, मुलांच्या जीवनात पुस्तकांची भूमिका वाढवणे आणि त्यांना सामाजिक, भावनिकदृष्ट्या सक्षम करणे हे देखील पालकत्वाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. पुस्तके (जीवनात पुस्तकांचे महत्त्व) आपल्याला केवळ इतिहास सांगत नाहीत तर त्यांच्या मदतीने आपले ज्ञान, कल्पनाशक्ती, तर्कशास्त्र आणि मानसिक आरोग्य देखील सुधारते. जर बारकाईने पाहिले तर कोणत्याही प्रकारचे पुस्तक विचार करण्याची आणि समजून घेण्याची क्षमता वाढवते. नवीन युगात, टीव्ही आणि मोबाईलच्या आगमनाने, लोकांची पुस्तके वाचण्याची आवड कमी झाली असेल पण तरीही पुस्तके ? आपले सर्वात चांगले मित्र (आंतरराष्ट्रीय पुस्तक दिन) आहेत. जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिनाचे महत्त्व (जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन थीम २०२५) आणि त्याच्याशी संबंधित अनेक मनोरंजक तथ्ये जाणून घेऊ या.

पुस्तक माणसाला बरोबर आणि चूक यात फरक करण्यास मदत करते. लहानपणी जेव्हा आपण पहिल्यांदा पुस्तक हातात घेतो तेव्हा आपल्याला त्या भाषेचे ज्ञान होते. केवळ पुस्तकांमुळेच माणूस त्याच्या सभोवतालचे जग समजून घेऊ शकतो. हे वाचल्याने केवळ शिक्षण मिळत नाही तर मानसिक आरोग्य देखील सुधारते. भावनिक विकासासाठी



पुस्तके महत्त्वाची असल्याचे म्हटले जाते. पंचतंत्राच्या कथा असोत किंवा सिंड्रेलाची कथा असो, प्रत्येक पुस्तक एक महत्त्वाचा संदेश देते. ही पुस्तकेच आपल्याला बाहेरील जगाची ओळख करून देतात. पुस्तके केवळ सामाजिक विकासाला चालना देत नाहीत तर कौटुंबिक बंधही मजबूत करतात. त्यांच्या मदतीने, लक्ष केंद्रित होते आणि मेंदू सक्रिय होतो.

का आणि केव्हा साजरा होतो जागतिक पुस्तक दिन

पुस्तकांचे महत्त्व सांगण्यासाठी दरवर्षी २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन साजरा केला जातो. या दिवशी जगातील जवळजवळ प्रत्येक देशात पुस्तक मेळावे भरवले जातात. या मेळ्यात लेखक आणि प्रकाशकांसह वाचकांनाही एकत्र येण्याची संधी मिळते. या दिवसाचा विशेष उद्देश म्हणजे लोकांना पुस्तके आणि शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे. जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन जगभरातील साहित्यिक, लेखक आणि वाचकांना जोडतो.

जागतिक पुस्तक दिनाची सुरुवात कोणी केली

जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिनाची सुरुवात संयुक्त राष्ट्रांच्या शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनेने म्हणजेच युनेस्कोने केली. युनेस्को ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे जी शिक्षण, विज्ञान आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी काम करते. पुस्तके वाचण्याची सवय वाढवण्याच्या आणि कॉपीराइट अधिकारांबद्दल जागरूकता पसरवण्याच्या उद्देशाने युनेस्कोने १९९५ मध्ये पॅरिस येथे झालेल्या संघटनेच्या सर्वसाधारण सभेत २३ एप्रिल रोजी हा दिवस साजरा करण्याची घोषणा केली होती.

जागतिक पुस्तक दिन २३ एप्रिलला का

तुम्हाला नक्कीच प्रश्न पडला असेल की या दिवसासाठी फक्त २३ एप्रिल का निवडला गेला? २३ एप्रिल हा जगातील तीन महान लेखकांचा पुण्यतिथी आहे, पहिला शेक्सपियर, दुसरा सर्व्हेंटेस आणि तिसरा गार्सिलासो. म्हणून, या दिवसाचे साहित्यिक महत्त्व लक्षात घेऊन, २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन साजरा करण्याची घोषणा करण्यात आली.

पुस्तक वाचावीत म्हणून

पुस्तके वाचण्याच्या उद्देशाला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी २३ एप्रिल रोजी जगभरात जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश लोकांमध्ये पुस्तके वाचण्यासाठी उत्साह आणि जागरूकता निर्माण करणे आहे. या दिवशी, जगभरात विविध कार्यक्रम (जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन उपक्रम) आयोजित केले जातात ज्याद्वारे पुस्तकांचे महत्त्व स्पष्ट केले जाते आणि लोकांना पुस्तकांच्या कॉपीराइट अधिकारांबद्दल जागरूक केले जाते.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |
| **नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक** | | |
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |
| **चरित्र/आत्मचरित्र** | | |
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |
| **कविता संग्रह** | | |
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |

| | | |
|---|---|---|
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूरकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |
| **चरित्र** | | |
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

| | | |
|---|---|---|
| **सामान्यज्ञान** | | |
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |
| **शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी** | | |
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |

| | |
|---|---|
| **कृषि विषयक पुस्तके** | |
| **डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील** | |
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**

CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD




Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform
Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization
Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 I +91 9822525444
Website : creatikmultiservices.com
Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709



# पहलगामच्या आधीही हल्ले, पण यावेळी धर्मावर चर्चा का?: शरद पवार



मुंबई : पहलगामच्या आधी देखील भारतावर अनेक वेळा हल्ले झाले. त्यावेळी कधीही धर्मावर चर्चा झाली नाही. यावेळी धर्मावर चर्चा का? असा प्रश्न शरद पवार यांनी उपस्थित केला आहे. झाले ते दुर्दैवी आहे. हा देशावरील हल्ला आहे. घडले ते वाईटच आहे. हे देशाला आव्हान आहे. याला आपल्याला सक्तीने तोंड द्यावेच लागेल. त्यानिमित्ताने धार्मिक अडचण वाढेल असे काम कोणीही करू नये, असे आवाहन देखील शरद पवार यांनी केले आहे.

धर्म विचारून गोळीबार करण्यात आला असे म्हणतात. मात्र, याबाबत सत्य काय हे मला माहित नाही. मात्र त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या स्त्रियांना दहशतवाद्यांनी हात लावला नाही. केवळ माणसांना मारण्यात आले असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.

### शहांच्या राजीनाम्यावर म्हणाले की...

केंद्र सरकारने काल घेतलेल्या सर्वपक्षीय बैठकीत चूक झाल्याचे सांगितले. मग गृहमंत्री अमित शहा यांनी राजीनामा दिला पाहिजे का, या प्रश्नावर शरद पवार म्हणाले की, भारतावर ज्यांनी हल्ला केला, त्यांना शोधून काढा. त्यांच्यावर सक्त कारवाई करा. त्यामुळे कुणाला काढा, असे आज मी बोलणार नसल्याचेही त्यांनी सांगितले.

### ३७० कलम हटवल्यानंतर केंद्र सरकार बधाई घेत होते

जम्मू-काश्मीरमधून ३७० कलम हटवल्यानंतर केंद्र सरकार बधाई घेत होते. मात्र काश्मीरी जनतेचे मत अजूनही वेगळे असावे, असे दिसत असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. सर्व काही शांत आहे, आता काही भीती नाही, असा सरकारचा दावा होता. यावरून आता शरद पवार यांनी टीका केली आहे.

### हा देशावर हल्ला, यात राजकारण नको

हा देशावर झालेला हल्ला आहे. त्यामुळे यामध्ये राजकारण नको, अशी भेट भूमिका देखील शरद पवार यांनी मांडली आहे. सरकार जो निर्णय घेईल, त्या निर्णयात सर्व पक्ष सरकारच्या बाजूने उभे असल्याचेही शरद पवार यांनी म्हटले आहे. ज्यावेळेस सीमेवर अशा पद्धतीच्या कारवाया होतात. त्यावेळी शासन असो किंवा विरोधी पक्ष सर्वांनी याकडे गांभीर्याने पाहायला पाहिजे. असा वेळी कटुता कशी कमी होईल याची काळजी प्रत्येकाने घेतली पाहिजे, असे देखील शरद पवार यांनी म्हटले आहे.

### काश्मीरमधील लोक भारताच्या बाजूने उभे राहिले, ही सकारात्मक बाब

ज्याने हल्ले केले त्यांना शोधून त्यांच्यावर सक्त कारवाई करण्याची आवश्यकता असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. त्यामुळे कोणाला काढा, कोणाला ठेवा, याविषयी आज बोलणार नसल्याचेही शरद पवार यांनी म्हटले आहे. जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ला झाला त्यावेळी काश्मीरमधील लोक रस्त्यावर आले आणि ते भारताच्या बाजूने उभे राहिले. ही अतिशय सकारात्मक बाब असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.

### स्थानिकांना झळ बसणार

मात्र, आता जम्मू-काश्मीरमध्ये पर्यटक जाणार नाहीत आणि त्याची झळ तेथील स्थानिक नागरिकांना बसेल याची चिंता असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता केंद्र सरकारने याकडे लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. केंद्र सरकारच्या वतीने या संदर्भात पाच महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आ-हेत. एका दृष्टिकोनातून पाकिस्तानला एक मेसेज देण्याचा प्रयत्न असल्याचा शरद पवार यांनी म्हटले आहे.

# २३२ पर्यटक श्रीनगरहून मुंबईत दाखल आतापर्यंत ५०० पर्यटक महाराष्ट्रात परतले

मुंबई : पहलगाम येथील हल्ल्यानंतर महाराष्ट्रातील पर्यटकांना सुखरूप आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार राज्य सरकारच्या वतीने विशेष विमानांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानुसार आज २३२ पर्यटकांना घेऊन इंडिगो विमान श्रीनगरहून मुंबईत दाखल झाले आहे. यावेळी विमानतळावर भाजप नेते व मंत्री आशिष शेलार उपस्थित होते. दरम्यान, सुमारे ५०० पर्यटक आतापर्यंत महाराष्ट्रात परतले आ-हेत. दोन विशेष विमानांनी १८४ पर्यटक मुंबईत पोहोचले होते.

पहलगाम हल्ल्यात २६ लोकांना आपला जीव गमवावा लागला. पुलवामा हल्ल्यानंतर हा सर्वात मोठा अतिरेकी हल्ला असल्याचे बोलले जात आहे. अतिरेक्यांनी नाव आणि धर्म विचारून गोळ्या मारल्याचे बोलले जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे या अतिरेक्यांनी केवळ पुरुषांनाच मारले आहे. घरातील मुख्य व्यक्तीच्या जाण्याने पीडित कुटुंबांवर दुःखाचे मोठे डोंगर कोसळले आहे.

या हल्ल्यात पर्यटकांना वाचवताना जीव गमावलेल्या आदिल शाह यांचे कुटुंबाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून ५ लाख रुपये तसेच घर बांधून देण्यात येणार आहे. आदिल शाह यांनी अतिरेक्यांच्या हातून बंदूक हिसकावण्याचा प्रयत्न केला, यावेळी त्याच्यावर ४ गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. एकनाथ शिंदे यांनी व्हिडिओ कॉलद्वारे आदिल शाह यांच्या कुटुंबाशी संवाद साधला व मदत जाहीर केली आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तातडीची बैठक घेऊन पुढील सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. आता भारत पाकिस्तानला सडेतोड उत्तर देणार असे बोलले जात आहे. त्या अनुषंगाने तयारी देखील करण्यात येत आहे, हवाई दलाने फायटर विमानांची चाचणी करणे देखील सुरू केले असल्याचे समजते.

# पर्यटकांचा बचाव करताना जीव गमावलेल्या काश्मिरी युवकाच्या कुटुंबाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून मदत

मुंबई : जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर हल्ला होत असताना स्वतःच्या जी-वाची पर्वा न करता पर्यटकांच्या रक्षणासाठी धावून जाणारा सय्यद आदिल हुसैन शाह या अवघ्या २० वर्षांच्या स्थानिक युवकाचा देखील दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाला. माणुसकी दाखवत धाडसाने दहशतवाद्यांना सामोरे जाणाऱ्या सय्यदच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त करतानाच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वैयक्तिकरित्या सय्यदच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची मदत केली आहे.

पहलगाम येथे मदतीसाठी गेलेले कार्यकर्ते व सरहद संस्थेचे पदाधिकारी यांच्या माध्यमातून आज सय्यदच्या कुटुंबियांना धनादेश देण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सय्यदच्या कुटुंबियांशी संवाद साधून त्यांना धीर दिला.


अवघ्या २० वर्षाचा असलेला सय्यद आदिल पहलगाममध्ये पर्यटकांना घोड्यावरुन फिरवण्याचं काम करायचा. त्याच्या घोड्यावरुन जो प्रवासी पहलागमची सफर करत होता त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. दहशतवादी समोर आल्यानंतर सय्यद याने धाडस दाखवत एका दहशतवाद्याची रायफल हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. दहशतवाद्यांनी त्याला गोळी मारल्याने त्याचा मृत्यू झाला.

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हुशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**

# महेंद्रसिंग धोनीने रचला इतिहास



चेन्नई : महेंद्रसिंग धोनीच्या शिरपेचात आता अजून एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. कारण धोनीने आता इतिहास रचला आहे. धोनी जेव्हा मैदानात उतरला तेव्हा त्याने हा विक्रम आपल्या नावावर केला आहे.

महेंद्रसिंग धोनीने आयपीएलमध्ये सर्वोत्तम कामगिरी केली आहे. चेन्नईच्या संघाला धोनीने पाचवेळा जेतेपदं जिंकवून दिले आहेत. धोनी या हंगामात चेन्नईचा कर्णधार नव्हता. पण ऋतुराज गायकवाड हा खेळत असताना दुखापतग्रस्त झाला. ऋतुराजची दुखापत गंभीर असल्यामुळे धोनीला कर्णधार करण्यात आले. आता धोनीने हैदराबादविरुद्धच्या सामन्यात मैदानात उतरताच त्याने आपल्या नावावर एक मोठा विक्रम केला आहे.

धोनी जेव्हा समरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यासाठी टॉससाठी उतरला तेव्हा त्याच्या नावावर हा रेकॉर्ड जमा झाला आहे. धोनीच्या नावावर आता ४०० टी ट्वेन्टी सामने झाले आहेत. धोनीने भारतासाठी ९९ टी २० सामने खेळले होते. धोनी आतापर्यंत आयपीएलमध्ये २७२ सामने खेळले आहेत. त्याचबरोबर चॅम्पियन्स लीगमध्ये धोनीने २४ सामने खेळले आहेत. धोनी त्याचबरोबर झारखंडसाठी टी २० सामने खेळला आहे. त्यामुळे धोनीच्या नावावर आता ४०० टी २० सामने झाले आहेत आणि तो चेन्नईचा पहिलाच खेळाडू ठरला आहे. धोनी चेन्नईचा कर्णधारही आहे आणि टॉस झाल्यावर त्याने आपल्या संघात दोन मोठे बदल केल्याचेही यावेळी सांगितले आहे. डेवाल्ड ब्रेव्हिससारखा खेळाडू आता चेन्नईच्या संघात दाखल झाला आहे. पण त्याचबरोबर धोनीकडे यावेळी सर्वांचे लक्ष असणार असल्याचे पाहायला मिळत आहेत.

धोनीने आतापर्यंतच्या आयपीएलमध्ये दमदार कामगिरी केली आहे. धोनीने दमदार फलंदाजी केली आहे. धोनीच्या यष्टीरक्षणाबाबत सर्वांनाच माहिती आहे. तो नेतृत्व करण्यात निष्णात आहे. त्यामुळे धोनीकडून यावेळी चाहत्यांना जास्त अपेक्षा असणार आहेत. त्यामुळे धोनी आता या आपल्या ४०० व्या सामन्यात कशी कामगिरी करतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे. त्यामुळे धोनीवर सर्वांचेच लक्ष असणार आहे. चेन्नई सुपर किंग्सने ११६/९ धावा केल्या.धोनीचा हा ४०० वा सामना आहे. चेन्नईची पहिली फलंदाजी असणार आहे. त्यामुळे धोनी फलंदाजीत कशी कामगिरी करतो, याची उत्सुकता आता सर्वांना असणार आहे.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021